01-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 31-05-2025 23:07 Page 1



स्मार्ट सिटीमधील सर्व रस्ते पूर्ण केल्याचे जाहीर » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




पुढच्या महिन्यापासून क्रिकेटचे नियम बदलणार » पान ४ वर

वेर्णा, रविवार, १ जून २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 269 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 1 June 2025 | Pages 4 | ₹ 4

# जेनिफर विरोधात 'आप'चा मोर्चा

## ताळगाव हल्ल्याच्या तक्रारीवर एफआयआर नाही | उलट आमच्यावरच गुन्हा दाखल केल्याची 'आप' ची तक्रार

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ३१ : ताळगाव येथील कथित हल्ल्याप्रकरणी आम आदमी पक्षाच्या (आप) कार्यकर्त्यांनी शनिवारी पणजी पोलिस ठाण्यावर मोर्चा काढत निषेध व्यक्त केला. २१ मे रोजी दाखल केलेल्या तक्रारीनंतरही कारवाई झाली नसल्याने नाराजी व्यक्त करत सिसिल रॉड्रिग्ज, आपचे राज्य सचिव फ्रान्सिस कोएल्हो आणि रुई मेनेझेस यांच्याविरुद्ध नोंदवलेला एफआयआर तत्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली. तसेच, ताळगावच्या आमदार जेनिफर मोन्सेरात , पंचायत सदस्य सिडनी बॅरेटो आणि इतरांविरुद्ध तातडीने गुन्हा नोंदवण्याचीही मागणी त्यांनी केली.**



२१ मे रोजी ताळगाव ओडशेल येथे कथित हमरातुमरीची घटना घडली होती. यानंतर सिसिल रॉड्रिग्ज यांनी स्थानिक आमदार जेनिफर मोन्सेरात, पंचायत सदस्य सिडनी बॅरेटो, तसेच बांधकाम व्यावसायिक सादिक शेख, मुदित गुप्ता आणि इतरांविरुद्ध तक्रार दाखल केली होती. मात्र, त्याच दिवशी उलटपक्षी सिसिल व इतरांवरच एफआयआर दाखल झाल्याचे समजल्याने आपलयाला धक्का बसल्याचे सिसिल यांनी सांगितले.

आपचे गोवा अध्यक्ष ॲड. अमित पालेकर यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले की, तक्रार दाखल होऊन १० दिवस झाले तरी अद्याप एफआयआर नोंदवलेला नाही. उलट, तक्रारदारांवरच गुन्हा दाखल केला गेला आहे. पोलिसांनी हे का आणि कोणाच्या दबावाखाली केले, याचे उत्तर त्यांनी द्यावे.

तक्रारीसंदर्भात माहिती देताना सिसिल रॉड्रिग्ज म्हणाल्या की, आमदार जेनिफर मोन्सेरात यांनी मला शिवीगाळ केली, शारीरिक हल्ला केला आणि सिडनी बॅरेटो यांनी आमच्या सहकरी तरुणाचा मोबाईल हिसकावून त्याला धक्का दिला. आम्ही याचे सर्व पुरावे, व्हिडिओ क्लिप्स, साक्षीदारांची नावे आणि कायद्याच्या तरतुदींसह पोलिसांकडे दिल्या आहेत. तरीही एफआयआर नोंदवलेला नाही.

त्याउलट, पोलिसांनी सिसिल व त्यांच्या सहकाऱ्यांविरुद्ध दाखल केलेल्या एफआयआरमध्ये कार्यकर्त्यांनी लोकप्रतिनिधींना त्यांच्या कर्तव्यात अडथळा आणला' असा आरोप करण्यात आला आहे. त्याविषयी प्रतिक्रिया देताना ॲड. पालेकर म्हणाले, एफआयआरमध्ये महिलांनी इतर महिला प्रतिनिधींच्या विनम्रतेला धक्का पोहोचवला' असा हास्यास्पद दावा करण्यात आला आहे. एक महिला दुसऱ्या महिलेला असे कसे करू शकते?

तक्रारीनंतर पोलिसांकडून प्रतिसाद मिळाला नसल्याने शनिवारपर्यंतची वाट पाहून सोमवारी पुढील कायदेशीर कारवाईचा निर्णय घेण्याचा इशारा 'आप'ने दिला आहे. या कारवाईमध्ये राज्य पोलिस तक्रार प्राधिकरण तसेच हायकोर्टात याचिका दाखल करण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे.दरम्यान, पणजीचे कार्यवाहक पोलीस निरीक्षक अनंत गावकर यांनी या प्रकरणात कारवाईसाठी तीन दिवसांचा वेळ मागितला असल्याचे समजते. आपच्या कार्यकर्त्यांनी राज्य स्थापनेच्या दिवशी पोलिस ठाण्यात एफआयआरची प्रत घेऊन ती 'पुरस्कार' म्हणून सादर केली. तसेच, अधिकृत एफआयआर नोंदवल्याशिवाय पोलिस ठाणे सोडण्यास नकार दिला होता.

# पूजा शर्माला क्लीन चीट : आसगाववासीयांचा संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

**आसगाव, दि. ३१ :** असागाव गावात आगरवाडेकर कुटुंबावर झालेल्या अन्यायाच्या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांनी पोलिस प्रशासनावर जोरदार टीका केली आहे. गेल्या वर्षी अर्धवट पाडलेल्या घरामुळे चर्चा झालेल्या प्रकरणात क्वीन बी' म्हणून ओळखली जाणारी जमीन मालकीण पूजा शर्मा हिला विशेष तपास पथकाने एफआयआरमधून वगळल्यामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आणि संताप व्यक्त होत आहे.

गावचे सरपंच हनुमंत नाईक म्हणाले की, एफआयआरमधून पूजाला वगळणे म्हणजे पोलिसांकडून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न आहे. जमीनमालक यात सामील नसेल, तर आगरवाडेकर कुटुंबियांचे अपहरण आणि जबरदस्तीचा हेतू काय? असा त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

गेल्या वर्षी पोलिसांच्या उपस्थितीत बाउन्सर्स आणि जेसीबीच्या सहाय्याने आगरवाडेकरांचे घर अर्धवट पाडण्यात आले होते. या घटनेनंतर गावकऱ्यांनी पावसात उभे राहून आगरवाडेकर कुटुंबाच्या समर्थनार्थ आवाज उठवला होता. मात्र आता पूजा शर्मावर कोणताही गुन्हा नोंदवण्यात आलेला नाही, हे दु:खद असल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली. सामान्य जनता आणि स्थानिक प्रतिनिधींचा आरोप आहे की, पोलिसांनी राजकीय दबावाखाली येऊन पूजावर कारवाई टाळली आहे. पोलिस जमीनमालकाला एफआयआरमधून कसा वगळू शकतात? यामागे मोठे राजकारण आहे, असं गावकरी इडा फोन्सेका यांचे म्हणणे आहे.

उत्तर गोव्याच्या सत्र न्यायालयाने पूजा शर्माचा अटकपूर्व जामीन फेटाळताना तिच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला होता. न्यायाधीश इर्शाद आगा यांच्या आदेशात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, गुन्हेगारी कटात अर्जदार लाभार्थी असल्याचे दिसते. तिने स्वतः आगरवाडेकरांविरुद्ध तक्रार दाखल केली होती, हेही दर्शवते की ती त्यांना मालमत्तेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करत होती.

त्याचप्रमाणे, अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी अर्शद ख्वाजा याने न्यायालयासमोर दिलेल्या १६४ कलमांतर्गत जबाबात बेकायदेशीर कृत्याची कबुली दिली आहे, असे न्यायालयाने नमूद केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने पूजा शर्माच्या बाजूने दिलेल्या निर्णयात एफआयआरमध्ये विसंगती असल्याची नोंद केली आहे. न्यायमूर्ती भरत पी. देशपांडे यांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे की, बाउन्सर्ससह घर पाडण्याच्या घटनेत मालमत्तेतील स्वारस्य असलेल्या व्यक्तीचा सहभाग प्रथमदर्शनी स्पष्ट दिसतो. मशीनरी आणि बाउन्सर्सचे संचालन सामान्य नागरिक करू शकत नाही.

या निकालामुळे गावकऱ्यांच्या संशयाला अधिक बळ मिळाले आहे.

पान २ ▶

## निवडक

### आयएमएफकडून कोणता देश घेतो सर्वाधिक कर्ज?

**नवी दिल्ली, दि. ३१ :** २२ एप्रिलला जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला होता. यामध्ये २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले होते. तसेच पाकिस्तान विरोधात कठोर कारवाईला देखील सुरुवात केली आहे. या काळात खचक्रने पाकिस्तानला मोठ्या प्रमाणात कर्ज दिले होते. याची जोरदार चर्चा झाली होती. दरम्यान, खचक्रकडून सर्वाधिक कर्ज कोणता देश घेतो? याबाबतची माहिती तुम्हाला आहे का? जाणून घेऊयात सविस्तर माहिती.
ऑपरेशन सिंदूर नंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये निर्माण झालेला तणाव. त्यानंतर, सर्वात जास्त बातम्यांमध्ये राहिलेल्या गोष्टींपैकी एक म्हणजे आयएमएफने पाकिस्तानला १ अब्ज डॉलर्सचे दिलेले कर्ज. पाकिस्तान मुख्यत्वे आयएमएफच्या भीक मागण्यावर अवलंबून आहे. परंतु जगात असे काही देश आहेत जे पाकिस्तानपेक्षा आयएमएफकडून जास्त कर्ज घेतात. भारताने आयएमएफकडून किती कर्ज घेतले आहे ते सांगूया. आयएमएफ जगातील देशांना त्यांची आर्थिक स्थिती सुरळीत राखण्यासाठी आर्थिक मदत करते. आयएमएफच्या मते, जगातील ९१ देशांना दिलेल्या कर्जांपैकी ६0 टक्के कर्ज फक्त ५ देशांना दिले जाते, ज्यामध्ये अर्जेंटिनाचा प्रथम क्रमांकावर आहे.

---

### ऑपरेशन सिंदूरवर भारताला पहिले यश

**नवी दिल्ली, दि. ३१ :**शशी थरूर यांच्या नेतृत्वाखाली भारताने ऑपरेशन सिंदूरवर पाठवलेल्या शिष्टमंडळाला मोठे यश मिळाले आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानात मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांबद्दल कोलंबियाने शोक व्यक्त केला होता, आता त्यांनी अधिकृतपणे आपले विधान मागे घेतले आहे. शिष्टमंडळाचे नेतृत्व करणारे शशी थरूर यांनी चिंता व्यक्त केली होती आणि म्हटले होते की, कोलंबिया सरकारच्या प्रतिक्रियेमुळे आम्ही (भारत) थोडे निराश आहोत. भारतीय शिष्टमंडळाची भेट घेतल्यानंतर कोलंबियाचे उपपरराष्ट्र मंत्री योलांडा विलाविचेंसिओ म्हणाले, 'आज आम्हाला मिळालेल्या स्पष्टीकरणाबद्दल आम्हाला विश्वास आहे. काश्मीरमध्ये काय घडले याबद्दल आता आमच्याकडे असलेल्या सविस्तर माहितीच्या आधारे, आम्ही संभाषण सुरू ठेवू शकतो...' कोलंबियाने आपले पूर्वीचे विधान मागे घेतल्याबद्दल काँग्रेस खासदार शशी थरूर म्हणाले, 'कोलंबियाचे उपपरराष्ट्र मंत्री यांनी अतिशय विनम्रपणे आम्हाला सांगितले की त्यांनी ज्या विधानावर आम्ही चिंता व्यक्त केली होती ते विधान मागे घेतले आहे आणि ते या प्रकरणावरील आमची भूमिका पूर्णपणे समजून घेतात, जे आमच्यासाठी खूप मौल्यवान आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाम हल्ल्यानंतर दहशतवादाविरुद्धच्या लढाईवर भारताची भूमिका मांडण्यासाठी भारतीय खासदारांचे एक सर्वपक्षीय शिष्टमंडळ विविध देशांना भेट देत आहे.

---

### पंजाब-हरियाणासह ६ राज्यात मॉक ड्रील

**नवी दिल्ली, दि. ३१ :** पाकिस्तान समर्थित अतिरेक्यांनी पहलगाम येथे २६ पर्यटकांना ठार केल्यानंतर दोन्ही देशात संबंध बिघडले होते. त्यानंतर भारताने देशव्यापी मॉक ड्रील केली होती आणि त्याच रात्री भारतीय वायूदलाने पाकच्या नऊ अतिरेकी तळांवर हवाई हल्ला केला. त्यानंतर भारताने सहा सीमावर्ती राज्यात आज शनिवारी पुन्हा मॉक ड्रील केली. या मॉक ड्रीलने परत पाकिस्तानच्या हृदयात धडकी भरली आहे. सीमेवरील जम्मू-कश्मीर, पंजाब, राजस्थान, गुजरात, हरियाणा आणि केंद्र शासित प्रदेश चंडीगड या सहा राज्यात शनिवारी मॉक ड्रील झाली. भारत-पाक तणावाचा काळ चालू आहे. जर अशावेळी हवाई हल्ला झाल्यास घ्यावयाची दक्षता आणि वैद्यकीय मदतीच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण शनिवारी झाले.

# जनजाती सुरक्षा मंचवर बंदीची गाकुवेधची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३१ :** गोवा राज्यातील गावडा, कुणबी, वेळीप आणि धनगर (गाकुवेध) समुदायांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महासंघाने शनिवारी पत्रकार परिषदेत जनजाती सुरक्षा मंच या संघटनेवर बंदी घालण्याची जोरदार मागणी केली. या मंचावर आरोप करण्यात आला आहे की, ते राज्यातील धर्मांतरित आदिवासींना अनुसूचित जमातींच्या यादीतून वगळण्याचा प्रयत्न करत असून त्यामुळे समाजात फूट पडत आहे.

गाकुवेध महासंघाचे अध्यक्ष गोविंद शिरोडकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, जनजाती सुरक्षा मंच हे जो ख्रिश्चन आहे, तो आदिवासी नाही आणि जो आदिवासी आहे. तो ख्रिश्चन नाही, असे विधान करत असून अशा प्रकारे देशभरातील आदिवासी समाजात धार्मिक आधारावर विभाजन करण्याचे धोरण राबवले जात आहे.

आदिवासी हिंदू, ख्रिश्चन वा मुस्लिम नसतात. त्यांच्या परंपरा, रीतिरिवाज व संस्कृतीच त्यांचा खरा धर्म आहे, असे शिरोडकर यांनी स्पष्ट केले.

त्यांनी पुढे सांगितले की, गोव्यातील आदिवासी समुदाय कोणत्याही प्रकारचा धार्मिक संघर्ष सहन करणार नाही आणि हिंदुत्ववादी विचारधारेच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केल्यास त्याला तीव्र विरोध केला जाईल. त्यांनी शासनाला आवाहन केले की अशा संघटनांवर तातडीने कारवाई करून गोव्यातील सामाजिक सलोखा अबाधित ठेवावा.

शिरोडकर यांनी १९२८ मध्ये घडलेल्या घटनेचा उल्लेख केला, जेव्हा मासुराश्रम या संघटनेने नवहिंदू गावडे' अशी नवी जात निर्माण केली. त्यामुळे पारंपरिक गोमंतक गावडे समाजात अस्मितेचे संकट निर्माण झाले आणि आजही त्याचे परिणाम जाणवतात, असे ते म्हणाले. जर ख्रिश्चन गावडे यांना अनुसूचित जमातींच्या यादीतून वगळले गेले, तर आदिवासी समुदायासाठी राखीव असलेल्या संधींचे प्रमाण तब्बल ४0 ते ५0 टक्क्यांनी घटेल, असा गंभीर इशारा शिरोडकर यांनी दिला.

शिरोडकर यांनी युनायटेड ट्रायबल्स असोसिएशन अलायन्स (उटा) या संघटनेवरही टीका केली. जनजाती सुरक्षा मंचने आयोजित केलेल्या एका बैठकीत यूटीएए पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतल्याचे निदर्शनास आणत शिरोडकर म्हणाले की, 'उटा'ला धर्मांतरित आदिवासींचा पाठींबा नको असून, या माध्यमातून समाजात अंतर्गत संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

गोव्यात अनुसूचित जाती-जमातींसाठी निवडून आलेले चार आमदार असूनही त्यांनी आपल्या समुदायाच्या समस्यांवर विधानसभेत आवाज उठवलेला नाही, अशी खंत शिरोडकर यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना व्यक्त केली.

या पत्रकार परिषदेला गाकुवेध महासंघाचे इतर पदाधिकारी रामकृष्ण जल्मी, जोसेफ वाझ आदी उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने सांगितले की, धर्माच्या आधारे आदिवासींच्या अधिकारांमध्ये हस्तक्षेप करणाऱ्या कोणत्याही संघटनेचा निषेध करण्यात येईल आणि समाजाच्या हक्कांसाठी लढा चालू ठेवण्यात येईल.

# भरधाव कारच्या धडकेत तरुणीचा मृत्यू; दुसरी गंभीर जखमी

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. ३१ :** वेर्णा औद्योगिक वसाहतीजवळ शनिवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात एक तरुणी जागीच ठार झाली, तर दुसरी गंभीर जखमी झाली आहे. परीक्षा देण्यासाठी भरधाव वेगाने गाडी चालवत कॉलेजकडे निघालेल्या विद्यार्थ्यांच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.

या दुर्घटनेत अनिषा सतीश बोरकर (२३, रा. केपे)हिचा जागीच मृत्यू झाला. तर अक्षता उदय नाईक (२३, रा. कारवार) ही तरुणी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर सध्या बांबोळी येथील गोवा वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (गोमेकॉ) उपचार सुरू आहेत.

वेर्णा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी ८.२0 वाजता हा अपघात घडला. जोनाथन परेरा (१९, रा. आगशी)हा युवक पाद्री कोसेसाव कॉलेज




(पीसीसी), वेर्णा येथे शिक्षण घेत असून, तो परीक्षा देण्यासाठी स्वतःची एसयूव्ही (जीए ०७ केए ०२६५ ) घेऊन कुठ्ठाळीहून वेर्णाकडे येत होता. वेर्णा येथील ह्युंडाई शोरूमजवळ रस्ता ओलांडत असलेल्या दोन तरुणींना त्याने जोरदार धडक दिली.

धडक एवढी भीषण होती की, अनिषा बोरकर हिचा जागीच मृत्यू झाला. तर अक्षता नाईक ही गंभीर जखमी झाली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघीही वेर्णा औद्योगिक वसाहतीतील एका फार्मास्युटिकल कंपनीत नोकरी करत होत्या आणि त्या वेळेस कामावर जात होत्या.

अपघाताची माहिती मिळताच वेर्णा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी मृत अनिषा बोरकर हिचा मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा केला व शवविच्छेदनासाठी पाठवले. जखमी अक्षता नाईक हिला त्वरित गोमेकॉ रुग्णालयात हलवण्यात आले.

अपघातानंतर चालक जोनाथन परेरा स्वतःहून वेर्णा पोलिस स्थानकात उपस्थित झाला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून, त्याच्याविरुद्ध आवश्यक ती कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास वेर्णा पोलिस निरीक्षक आनंद शिरोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# भारत – पाकिस्तान युद्ध थांबवल्याचा ट्रम्प यांचा पुनरुच्चार

## काँग्रेसने केली केंद्र सरकारवर टीका | ट्रम्प यांच्या दाव्यावर मागितले स्पष्टीकरण

**वॉशिंग्टन, दि. ३१ :**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तानमधील अलीकडील युद्ध थांबवल्याचा दावा पुन्हा एकदा केला आहे.शुक्रवारी झालेल्या ओव्हल ऑफिसमधील पत्रकार परिषदेत ट्रम्प म्हणाले की, आम्ही भारत आणि पाकिस्तानला युद्ध करण्यापासून रोखले आहे. मला वाटते की हे युद्ध अणुआपत्तीच्या स्वरूपातही परिवर्तित होऊ शकले असते.ट्रम्प यांनी पुढे स्पष्ट केले की, जे लोक एकमेकांवर गोळीबार करत आहेत आणि संभाव्यतः अणुशस्त्रे वापरत आहेत, अशा देशांशी आपण व्यवहार करू शकत नाही.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या हल्ल्यानंतर भारताने ६-७ मे दरम्यान मध्यरात्री पाकिस्तान आणि पाकिस्तान



प्रशासित काश्मीरवर लष्करी कारवाई केली. या कारवाईनंतर दोन्ही देशांमधील तणाव एवढा वाढला की ते लष्करी संघर्षात रूपांतरित झाला.

हा संघर्ष १० मे रोजी दोन्ही देशांनी युद्धबंदी करार जाहीर केल्याने संपुष्टात आला. युद्धबंदीची घोषणा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रथम केली आणि त्यांनी यामध्ये अमेरिकेची भूमिका महत्त्वाची असल्याचा दावा केला.दुसरीकडे, भारत आणि पाकिस्तानमधील डीजीएमओ स्तरावरील चर्चेनंतर युद्धबंदीवर सहमती झाल्याची माहिती भारताकडून वारंवार देण्यात आली आहे.

ट्रम्प यांनी वारंवार व्यापार चर्चांचा उल्लेख करत, भारत-पाकिस्तान संघर्षावर अमेरिकेने आळा घातल्याचा दावा केला आहे. मात्र, काँग्रेसने या दाव्यांवरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रश्न विचारले आहेत. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी ट्विटरवर ट्रम्प यांची विधाने शेअर करत पंतप्रधान मोदींना प्रश्न विचारला, डोनाल्ड भाई सातत्याने सांगत आहेत की त्यांनी भारत-पाकिस्तानच्या चार दिवसांच्या युद्धाला थांबवले. पण नरेंद्र मोदी यांचा काहीही प्रतिसाद नाही. ते का गप्प आहेत?

त्यांनी पुढे म्हटले आहे की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प हेच करत आहेत जे मोदींनी नेहमीच केले आहे. मोठमोठे दावा आणि कधी कधी खोटे बोलणे? किंवा त्यांचा अर्धा हिस्सा सत्य आहे?

दरम्यान भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी म्हटले आहे की भारत कधीही अणू ब्लॅकमेलला बळी पडणार नाही. जयशंकर शुक्रवारी, ३0 मे रोजी गुजरातमधील वडोदरा येथील पारुल विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना संबोधित करत होते. या दरम्यान त्यांनी पहलगाम हल्ल्याचा उल्लेख केला. जयशंकर म्हणाले, अलीकडेच, आम्ही जम्मू आणि काश्मीरची पर्यटन अर्थव्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न आणि धार्मिक मतभेदांची बीजे पेरण्याचा दुष्ट हेतू पाहिला आहे. ते म्हणाले की, याला उत्तर देण्याची गरज आहे. दहशतवादाविरुद्ध भारताचे शून्य सहनशीलतेचे धोरण त्याच्या कृतींमधून दिसून येते. आम्ही कधीही अणु ब्लॅकमेलला बळी पडणार नाही. भारताच्या राष्ट्रीय हितासाठी आवश्यक असलेले जे काही निर्णय घेतले गेले आहेत आणि घेतले जातील असे जयशंकर यांनी स्पष्ट केले.